ग्रामपंचायतीचे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून करावयाचे कर्तव्यात कसुर केल्याने शिक्षा अंतिम करणे बाबत.(श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत मोहरी, तालुका पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई-२३१७७१४/२६२/२०२५

दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १.आयुक्त, महिला व बालकल्याण विकास,पुणे यांचे कडील पत्र जा. क्र.म.रा.बा.सं./पुणे/२०२४-२५/३३० दिनांक २१/०३/२०२५.

२.गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचे पत्र जा.क्र/आस्था-२/५४२/२०२५, दिनांक ०२/०७/२०२५.

३.इकडील कारणे दाखवा नोटीस ग्रापं-३/१७८/२०२५, दिनांक १९/०९/२०२५.

४.श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर, ग्रामपंचायत अधिकारी यांचा नोटीस खुलासा दिनांक ०६/१०/२०२५.

श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर, ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत मोहरी तालुका पाथर्डी यांनी ग्रामपंचायतीचे बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणुन करावयाच्या कर्तव्यात कसुर केल्याने संदर्भ क्र.३ अन्वये त्यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक.१ च्या आयुक्त, महिला बालकल्याण विकास पुणे यांचा अहवालनुसार श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत मोहरी तालुका पाथर्डी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणुन सदर प्रकरणी बालकाच्या हितास अनुसरुन कार्यवाही करण्यास कसुर केला आहे. त्यांच्याकडे सोपविलेली जबाबदारी दक्षतेने विहित वेळेत पार न पाडल्याचे दिसुन येत आहे.

श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर, ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत मोहरी तालुका पाथर्डी यांचे दिनांक १२/१०/२०२३ च्या पत्रानुसार संबंधित कु.स्वाती संजय खटके यांचा विवाह, पत्र दिल्यानंतर झालेला नसल्याचे स्पष्ट होत आहे. संदर्भ क्र.१ च्या चौकशी अहवालास सहमती दर्शवून चौकशी अहवालातील निष्कर्ष पाहता श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे.

सबब, श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर, ग्रामपंचायत अधिकारी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही, अशा रितीने दोन वर्षाकरीता का थोपविण्यात येऊ नये ?, याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. याबाबतचा नोटीसचा खुलासा संदर्भ क्र.४ नुसार सादर केलेला आहे.

सदर खुलाशाचे अवलोकन करण्यात आलेले असुन सदरचा खुलासाच्या अनुषंगाने श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर,ग्रामपंचायत अधिकारी यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही,अशा रितीने एक वर्षाकरीता थोपविणे, ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवापुस्तकात नमुद करुन नियमोचित कारवाई करावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५११२८०६०७६५ असा आहे.

**Signed by Anand Subhashlal Bhandari**
**Date: 28-11-2025 18:46:00**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति:-

श्री श्रीकृष्ण बाबुराव खटावकर, ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत मोहरी, तालुका पाथर्डी व्दारा - गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी.

२/- सदरचा आदेश संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.